(5)

SIMRJ ISSN: 2455-1511 Vol. V Issue-I Jul-Aug-Sep 2019

SANSKRUTI INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

*Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj*

# अदानी परत जा! 'अदानी समुहाला आवंटीत केलेल्या ताडोबा उद्याना शेजारील कोळसाखाणी विरोधात चंद्रपूर जिल्हयातील जनता व स्वयंसेवीसंस्थांच्या आंदोलनाची फलश्रुती'

महेश प्रभाकर रत्नपारखी[1*] डॉ. ए. आय. खान[2]

१. सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर, जि. जालना. Email: maheshgeo27@gmail.com

२. सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख, शासकिय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद. जि. औरंगाबाद, 001mahekkhan@gmail.com

**सारांशः**

अलीकडे जगातील कोणत्याही प्रदेशातील वने, प्राणी, पक्षी, व एकुणच नैसर्गिक घटकांच्या संरक्षणाकरीता, किंवा प्राण्यांच्या शिकारी सारख्या होणाऱ्या घटनांवर आळा घालण्याकरीता स्वंयसेवीसंघटनांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. जगातील विविध देशांमध्ये पर्यावरण संरक्षणा करीता शासकिय यंत्रना किंवा सबंधीत मंत्रालयाकडून निरनिराळ्या उपाययोजना केल्या जात आहेत, परंतू अत्यंत लाजीरवानी बाब अशी की, पशु, पक्षी व वने एकुणच पर्यावरणाच्या बचावाकरीता शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संघटनांना किंवा सामान्य जनतेला कोणत्याही प्रकारचीही मदत करतांना दिसत नाही. शासकीय यंत्रणासुध्दा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खाणमालकांची किंवा कार्पोरेट लॉबीची मदत करतांना दिसतात. जागतीक पातळीवर अनेक स्वयंसेवी संस्था वने, प्राणी, पर्यावरण व नैसर्गिक संसाधनांच्या बचावाकरीता कार्यरत आहेत, व यांची कार्य सुध्दा शासकीय कार्यांपेक्षा अधिक उत्तम आहेत. स्वयंसेवीसंघटना कसल्याच प्रकारचे स्वार्थ न बघता स्वईच्छेने अशा कार्यामध्ये स्वताला झोकुन दिले आहे. ते नेहमी सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी असतात, ही बाब अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळेच यांच्या यशाचा आलेख दिवसेंदिवस वाढतच आहे. अशा प्रकारची घटना महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील जगप्रसिध्द 'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा'मध्ये घडली आहे. येथिल सामाण्य जनतेनी काही स्वंयसेवी संघटनांची मदत घेवून या अदानी पॉवर लिमीटेड कंपनीला आवंटीत केलेल्या कोल प्रकल्पांचा विरोध केला, शेवटी वने व पर्यावरण मंत्रालयाने सुध्दा हा प्रकल्प बंद पाडण्यास भाग पाडले. प्रस्तुत लेखामध्ये खाणमालक व कार्पोरेट लॉबी यांच्या विरोधात जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता व स्वयंसेवी संघटनांचा संघर्ष, जनतेला स्वयंसेवीसंघटनांनी केलेली मदत व सर्वसामान्य जनतेचा विजय यावर प्रकाश टाकला आहे.

**बिजसंज्ञाः** स्वयंसेवी संघटनांची कार्य, लोकांचा सहभाग, लोकसंघटनांचा विजय.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad



Scanned with OKEN Scanner

**प्रस्तावना:**

एकविसावे शतक, औद्योगिक युग म्हणून ओळखल्या जातो. या युगात औद्योगिकीकरण व तंत्रज्ञानांचा फार झापाट्याने विकास झाला आहे. परिणामतः मानवाच्या एकुणच कियांमध्ये नाट्यमयरित्या बदल आले, यामध्ये केवळ मानवी जीवनच ढवळून निघाले असे नाही तर सोबतच मणुष्य वास्तव्य करीत असलेल्या सभोवतालच्या वनांवर सुध्दा विपरीत परिणाम झाला आहे. या प्रभावाचा पर्यावरणातील वनस्पती व प्राणी यांच्यावर ऋणात्मक बदल झाला आहे. उद्योगधंद्याना लागणारा कच्चामाल हा नैसर्गीक घटकांवर अवलंबून असतो, अशा कच्च्यामालापासून मानव उपयोगी पक्की वस्तु तयार केली जाते. या क्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणात टाकावुपदार्थ बाहेर टाकली जातात. उद्योगधंद्यांमध्ये कोळसा, लोहखणीज व अन्य इंधन वापरण्याची जनू स्पर्धाच निर्माण झाल्याचे चित्र जानवते. आंतराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये या खणीजांची बोली लावून खरेदी केल्या जाते. जगातील कोणत्याही देशाच्या औद्योगिक विकासामध्ये काळशाचा आधिक मोलाचा वाटा आहे. जगातील 70 टक्के विद्यूत कोळशापासून तयार केली जाते. भारतीय स्थितीसुध्दा यापेक्षा वेगळी नाही. येथील 65 टक्के विद्यूत येथिल घनदाट जंगलामध्ये, नदीखोऱ्यामध्ये व अभयारन्यांच्या शेजारील असलेल्या खाणीमधून निघणाऱ्या कोळशापासून तयार केली जाते. **'कोल इंडिया लिमीटेड'** हि भारतातील कोळसा खाणकाम व्यवसायातील अग्रगण्य कंपनी असुन, ही कंपनी इतर कंपण्यांना खाणी अवंटीत करते परंतु अलीकडे कोळसा कंपनीकडून अनियंत्रीत खणन केल्या जात असल्याणे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे, कारण या कंपनण्यांना देवू केलेले कित्येक ब्लॉक अत्यंत घनदाट वनाच्छादीत प्रदेशात, वन्यप्राण्यांच्या निवासक्षेत्रांत व राष्ट्रीय उद्यानाशेजारी, बफरझोनला खेटून आहेत. खाणकाम व्यवसाय हा पर्यावरणाचा ऱ्हास करणारा उद्योग आहे. अशाच प्रकारचा महाराष्ट्रातील चंद्रपरू जिल्ह्यातील कोल ब्लॉक **'अदानी पॉवर लिमीटेड'** या कंपनीला आवंटीत करण्यात आले परंतु जिल्ह्यातील जनता व विवीध स्वंयसेवी संस्थांनी याघटनेचा तिव्र निषेध करुन विरोध दर्शवीला आहे. या स्वयंसेवी संघटनांनी कोलकंपनी, प्रशासन व शासनासोबत लढादेण्यांचा बेत आखला. यामध्ये जिल्ह्यातील सर्वसाधारण जनता व स्वयंसेवी संघटनांनी ही लढाई जिंकली आहे, त्यामुळे 'अदानी पॉवर लिमीटेड'ला आवंटीत केलेले कोल ब्लॉक रद्द केला आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता व स्वंयसेवी संस्था यांच्या संघार्ष करुन पर्यावरणीय प्रभावाला व वाघांच्या संखेकरीता जगप्रसिध्द 'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा'चे कशा प्रकारे संवर्धन केले याचा आढावा घेण्यात आला आहे.


**अभ्यास क्षेत्र:**

प्रस्तुत संशोधना करीता अदानी पॉवरल लिमीटेड कंपनी विरोधात चंद्रपूर जिल्ह्यातील आंदोलनाचा अभ्यास करण्याकरीता निवड केली आली आहे. चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा असून या जिल्ह्यात एकुण 34 टक्के वनक्षेत्र अस्तीत्वात असुन. वनक्षेत्रांच्या बाबतीत गडचिरोली जिल्ह्यानंतर चंद्रपूर जिल्ह्याचा दुसरा कमांक लागतो. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी, विद्यूत निर्मीती व सिमेंट उद्योग कारखाने अस्तीत्वात आहेत. जगप्रसीध्द **'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प'** याच जिल्ह्यात आहे. या उद्यानामध्ये सध्याघडीला 150 पेक्षा जास्त वाघ



Govt. College of Arts & Science
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
ASST. PROF.
M.E.S.
Govt. College of Arts
Science A'bad.
Scanned with OKEN Scanner

आहेत. महाराष्ट्राच्या अगदी पूर्वेला याचे स्थान 19$^{0}$.96'' उत्तर अक्षवृत्त व 79$^{0}$.53 पूर्व रेखांवृत्तावर चंद्रपूरचे स्थान आहे. हे शहर "Black Gold City"नावाने सुध्दा परिचीत आहे, शहराच्या परिसरांमध्ये 9 तर जिल्ह्यात एकुण 36 खाणी अस्तीत्वात आहेत.




अदानी ग्रुपला आवंटीत केलेली वन जमीन

गृहितके:

i. औद्योगिक कारखान्यांना लागणारे संसाधन मिळविण्याच्या शर्यतीत शहरांचा विकास व पर्यावरण स्वंरक्षण यांच्यात संघर्ष निर्माण झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

ii. देशांमध्ये वने व पर्यावरण मंत्रालयाची अत्यंत कठोर कायदे असुनसुध्दा पर्यावरण संदर्भातील कोणतेही कार्य लोकांच्या व स्वंयसेवी संघटनांच्या सहभागाशिवाय किंवा प्रभावी कार्याशिवाय अर्थहीन आहे.

iii. केवळ देशातीलच नाही तर जगातील उद्योजक व कॉर्पोरेट लॉबी कडून मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर करुन शासनाला आपल्या बाजूंनी निर्णय घेण्यास भाग पाडतात.

उद्येशः

i. कॉर्पोरेट लॉबी विरोधातील आंदोलन स्वंयसेवी संघटना व जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेनी यशस्वीरित्या पार पाडले त्याचा अभ्यास करणे.

ii. भारतातील विकसीत प्रकल्प व त्यांच्या विपरीत परिणामांच्या बाबतीत जनतेच्या दृष्टीकोणाचे महत्व तपासने.

अभ्यास पध्दती:

आंदोलकांनी घडवून आनलेले निरनिराळे कार्यकम, नंतर त्यांनी तिव्र विरोध दर्शविण्यास उचललेले पाऊल या कार्यकमांचा सुक्ष्म अभ्यास व निरीक्षण करण्यात आले आहे. आंदोलनाशी सवंधीत सार्वजनिक सुनावनी, लोकांनी ठरवीलेले निर्णय यांच्या चित्रफितींचे अवलोकन करण्यात आले आहे, तसेच विविध प्रकारची शासकीय दरतावेज, त्यातही वनविभागाकडून माहीतीच्या आधिकाराखाली मागवीलेली माहीती व आकडेवारी, व त्याचे दृष्टीकोण इत्यादी. सर्वसामान्य



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
ASST. PROF.
M.E.S. Class-I
Govt. College of Art's
Scanned with OKEN Scanner

जनतेनी एकजुट होवुन केलेले आंदोलन केव्हांही यशस्वी होतात, यातून एकतेची भवना दिसून येते. या संदर्भातील विविध दैनिक पत्रीकांमध्ये आंदोलना संदर्भात घेतलेला आढावा, यांचासुध्दा अभ्यासाकरीता उपयोग झाला. एकुणच प्रस्तुत संशोधनलेख पुर्णत्वास नेन्यास दुय्यम माहीतीचा अधिकतर उपयोग करण्यात आला. यात दैनिक पत्रींकातील लेख, वनविभागाची दस्तवेज, **महाराश्ट्र पोलुशन कंट्रोल बोर्ड** कार्यालयातील माहीती व आकडेवारीचा उपयोग करण्यात आला आहे.

**'अदानी पॉवर लिमीटेड कंपनी'ला आवंटीत केलेले कोल ब्लॉक:**

जिल्ह्यातील लोहारा कोल ब्लॉक व लोहारा वाढीव कोल ब्लॉक ही दोन्ही कोल ब्लॉक 'अदानी पॉवर लिमीटेड' या कंपणीला 2007 मध्ये आवंटीत केली. असा अनुमान आहे की, या कोल ब्लॉक मध्ये 170 दसलक्ष टन भूमिगत कोळशाचे संचित साठे अस्तीत्वात आहेत.या खाणीतील कोळसा गोंदीया जिल्ह्यातील तिरोडा गांवातील विद्यूत प्रकल्पा करीता पुरवील्या जाणार आहे. वने व पर्यावरण मंत्रालयाने हे कोल ब्लॉक आवंटीत करते वेळी काही प्राथमिक अटी लादल्या होत्या. कंपनीला चंद्रपूर जिल्ह्याच्या झालर क्षेत्रातील 1750 हेक्टर जमीन देवू केली. या क्षेत्रापैकी 1573.56 हेक्टर जमीनीवर घनदाट अरण्ये आहेत आणि हा क्षेत्र ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील अस्तीत्वात वाघ व अन्य प्राण्यांचे भ्रमणती क्षेत्र आहे. येथील अरण्य तेलंगाना राज्यातील केवाल प्राणी संगहालय, इंद्रावती प्राणी संग्रह (महाराष्ट्र) व छत्तीसगढ राज्यातील अरण्यांना खेटलेला आहे. अदानी पॉवर लिमीटेड कंपनीला एकुण आवंटीत क्षेत्रांपैकी 81.8 हेक्टर जमीन शासकीय तर 94.63 टक्के लोहारा गावातील खाजगी जमीन आहे. वनाच्छादीत जमीन ही ब्रिट कमांक 388, 389, 390, 395, 396 व 340 वनक्षेत्रातील आहे, पैकी यातील दोन बिटे 'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा'तील बफर झोन मधील आहे. खाणीमधून बाहेर पडणाऱ्या मातीच्या डंपिंग करीता कंपनीने पुन्हा 500 हेक्टर आगावू जमिनिची मागणी केली आहे. म्हणजेच कंपनीने एकुन 1800 हेक्टर जमीन संपादीत केली आहे. याकरीता उपविभागीय वनाधिकारी चंद्रपूर वन विभाग कार्यालयाने तसेच महाराष्ट्र शासनाने तशी परवाणगी सुध्दा दिली आहे.

**कोळसाखाणींचा पर्यावरणावरील संभाव्य प्रभाव:**

खरेतर चंद्रपूर जिल्ह्यातील पर्यारणीय स्थिती अत्यंत खालावलेली आहे, तसेच परिस्थितीकी सुध्दा नष्टझाली आहे, शासनाने माण्यता दिलेल्या नविन खाणीमध्ये खाणकामाला सुरवात झाली तर यात पुन्हा भर पडेल नव्हे तर वन्यप्रानी, विवीधरंगी पक्षी, विविध प्रकारचे वनस्पती नष्ट होतील, कोल कंपनीने या प्रदेशाचा अभ्यास करुन अहवाल दिला आहे की, येथिल जैवविवीधता अत्यंत महत्वपूर्ण आहे, येथे विविधप्रकारचे वनस्पती व प्राण्यांच्या जाती अस्तीत्वात आहेत, यात 143 प्रकारच्या वनस्पती, 84 प्रकारचे पक्षी, 15 प्रकारचे उभयचर, 13 प्रकारच्या पालीच्या जाती, 15 प्रकारच्या सापांच्या जाती अस्तीत्वात आहेत. अगोदरच कंपनीने जैवविवीधतेने नटलेल्या 1200 हेक्टर वनाच्छादीत जमीनीत खोदकाम केले आहे. वनविभागानुसार या भागात 6 पेक्षा जास्त संखेने वाघ भ्रमन करतांना नरजेस आले आहेत. हा क्षेत्र जिल्ह्यातील महत्वपूर्ण झरपट नदीचे पानलोट क्षेत्र आहे, नदीचा येथील रहीवाशांना फार मोठा आधार आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा पासून



Asst. Prof.
M.E.S.Class-I
Govt.College of Art's
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

हा वनक्षेत्र जरी वेगळा असला तरीसुध्दा वन्य प्राण्यांचे भटकंती क्षेत्र आहे. अगोदरच जंगलाचे प्रमाण कमी झाल्याने वन्य प्राणी शहरामध्ये आल्याच्या अनेक घटना येथे घडल्या आहेत त्या मुळे येथे वन्य प्राणी व मानवामध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. जंगलातील वनीकरण पध्दती, खाणी व औद्योगिकरण यामुळे येथील जंगले आकसली गेली आहेत. खाणीमुळे बाजुच्या खेड्यातील लोकांना पाळीव प्राण्यांकरीता चारा, घरांना गवत मिळायचा परंतु तें आता संपुर्णतः नष्ट झाले आहे,तसेच वनऔषधी वनस्पती, विवीध झाळे झुडपे नष्ट होणार या सर्व कारणांमुळे सभोवतालच्या खेड्यातील वास्तव्यास असलेल्या लोकांनी यावर आक्षेप घेतला व या खाणींना विरोध दर्शविला आहे. चंद्रपूर शहर अगोदरच प्रदूषीत शहर म्हणून ओळखल्या जाते. येथिल सर्वसामान्य जनता विवीध आजाराने ग्रासलेली आहे व असाह्य आजारांना समोरे जात आहेत. त्यामुळे विविध स्वंयसेवी संस्था व येथिल सर्वसामान्य जनतेनी खाण कंपनी विरोधात व शासनाच्या निर्णया विरोधात मोठे आंदोलन उभारले होते.

**स्वंयसेवी संस्थांचे आंदोलन व विरोधः**

शासनाने अदानी समुहाला 'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा'शेजारील जी जमिन आवंटीत केली होती त्या विरोधात ज्या स्वंयसेवी संघटना व अन्य संघटनांनी प्रत्यक्ष भाग घेवुन आंदोलन उभे केले, त्या संघटना खालील प्रमाणे. यात ग्रीण प्लॅनेट सोसायटी, इको–प्रो, इंडियन मेडिकल असोसिएशन, जेस्ट नागरीक संघ, श्रमिक एल्गार, चंद्रपूर बार असोसिएशन, मर्चन्ट असोशिएशन, महिला मंडळे, केरला समाजम, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी, चंद्रपूर ऑटोरिक्षा असोसिएशन, सराफा असोसिएशन, सिटीझन फोरम, चेंबर ऑफ कॉमर्स, मेडिकल रिप्रेझेटेटीव्ह असोसिएशन, केमिस्ट एन्ड ड्रगीस्ट असोसिएशन, रोटरी क्लब, लायन्स क्लब, माहेश्वरी समाज संघटना, डेबुजी फोर्स, संभाजी ब्रिगेड, प्रहार संघटना, गोंडवाना स्टच्यूडंट असोसिएशन, नॅशनल ड्रगिस्ट मेडिकल असोसिएशन, रोट्रॅक्ट, शिक्षक परिषद, फोटोग्राफर असोसिएशन, बजरंगदल, बिरसा सेना, मानवाधिकार असोसिएशन, वृक्षाई, महिला आस्था मंच, मल्हार सेना, अहिल्याबाई होळकर फोरम ऑफ इंडिया, विमुक्त जाती जमाती एकता मंच, पृथ्वीमित्र निसर्ग संस्था, अग्रसेन मंडळ, अयप्पा कमेटी व पेंटर असोसिएशन अशा अनेक सामाजिक संघटनांनी उग्र मोर्चे, सार्वजनिक सभा, व पत्रके वाटून या घटनेचा विरोध केला. एकुण 40 संघटनांनी शासनाच्या निर्णयाचा विरोध केला. या सर्व कार्यामध्ये ग्रिन प्लॅनेट सोसायटी, इको–प्रो या संघटनांनी पुढे येवून सर्व संघटनांचे नतृत्व केले व यांच्या मार्गदर्शनाखाली **'लोहारा जंगल बचाओ कृति समिती'**ची स्थापना केली. संघटनेनी खाणकाम सुरु असलेल्या क्षेत्रामध्ये प्रवेश करण्यास मज्जाव केला.

संघटनेनी विरोधात्मक केलेले महत्वपूर्ण कार्य.

1) 'लोहारा जंगल बचाओ कृति समिती'ची पहीली सार्वजनिक सभा दि.11 सप्तेंबर 2008 मध्ये घेण्यात आली. यामध्ये खाणीच्या व शासनाच्या निर्णयाचा विरोध करण्यात आला. या मध्ये स्वयंसेवी संघटनांनी कडाळून विरोध दर्शविला, परंतु ही सभा निष्प्रभ ठरली, कारण अदानी पॉवर लिमीटेड कंपनीने 'पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन' (EIA)कार्यालयाकडून नाहरकत



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Asst. Prof.
Scanned with OKEN Scanner

प्रमाणपत्र मिळविले. परंतु शासनाने आंदोलनकर्त्यांना आश्वासन दिल्यानंतर सार्वजनिक सभेमध्ये संपुर्ण ताकतिनीशी विरोध करण्यात आला.

2) दिनांक 7 ऑक्टोबर 2008 पासून स्वयंसेवी संघटनांनी लोकांना या आंदोलनात सहभागी करण्या करीता विशिष्ट व नाविण्यपुर्ण आंदोलने करण्यास सुरवात केली तसेच डॉ. दुधपाचारे यांच्या मार्गदर्शनाखाली 'जंगल बचाओ' सत्याग्रह नावाने संघटन स्थापन करुन त्यानाध्यमातून काळ्या रंगाने Go back Adaniसारखे स्लोगन तयार करुन सामान्य लोकांपर्यन्त निरोप पोहचविण्या प्रयत्न केला व याला यश सुध्दा मिळाले. परिणामतः शासनापर्यन्त हा निरोप पोहचविण्यात आला, जंगलाच्या शेजारील खेड्यातील लोक जागृत झाले, **श्री नितीन वंडोस** यांच्या नेतृत्वाखाली नागपूर आधिवेशनामध्ये पायदळ मोर्चा नेण्यात आला. **श्री सुरेश चोपने** यांनी तात्वीक पध्दतीने जंगलाचे महत्व समजवून देण्याचा प्रयत्न केला. दिनांक 23 ऑक्टोबर 2008 ला वनपुजन आंदोलन उभारण्यात आले, व दोन अन्नत्याग उपोषन करण्यात आले.

3) दिनांक 15 डिसेंबर 2008 रोजी नागपूर हिवाळी अधिवेश सुरु असतांना विधीमंडळासमोर पर्यावरण प्रेमी श्री. वंडू धोत्रे यांनी 8 दिवसाच्या उपोषणाला सुरवात केली. त्यानंतर दिनांक 20 जुलै 2009 पासुन वेगवेगळे आंदोलन करण्यात आले यामध्ये रस्ता रोखो, रस्त्यावर लोटांगन घालून चक्का जाम, मुंडन करुन शासना विरोधी तेरवी व चौदावी सारखे आंदोलन आंदोलनकर्त्यांनी केले.

4) पर्यावरण प्रेमी डॉ. दुधपाचार व श्री. वंडू धोत्रे यांनी कोल कंपनी विरोधात, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात खटला दाखल केला.

5) कित्येकदा पत्रकार परिषदा घेवून आंदोलनामध्ये सहभागी होण्याकरीता व सहयोग देण्याकरीता हाक दीली तसेच या संदर्भात जनजागृती निर्माण व्हावी करीता, पथनाट्य, नुक्कड, विवीध संस्थांमार्फत पत्रके वाटप केल्या गेली, सार्वजनीक सभा, शारदा मंडळे व गणपती मंडळे यांचा या आंदोलनाला मक्कम पाठींबा दिला.

6) आंदोलनकर्त्यांनी चंद्रपूर शहरामध्ये भारतातील प्रसिध्द पर्यावरणवादी व समाजकार्यकर्ते डॉ. बनवारीलाल शर्मा, मेधा पाटकर, उमेश चौबे, राजेंद्र सिंग व अन्य सामाजिक कार्यकर्त्यांचे समाज जागृती करीता, कंपनी विरोधात विचार ऐकुन घेण्याकरीता व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले व प्रत्रकार परिषदा घेण्यात आल्या.

7) आंदोलनकर्त्यांनी विवीध कार्यालयातील आधिकाऱ्यांच्या खाणींना विरोध करण्यास भेटी घेतल्या महाराष्ट्रातील सर्वच म्हणजे 288 आमदारांना निवेदने, पत्रके देवून, त्यांना ही बाब लक्षात आनुन देण्याचा प्रयत्न केला. तसेच मुख्यमंत्री, पंतप्रधान, वने व पर्यावरण मंत्री व कार्यालयीन सचिन यांना एकुण सर्व पार्श्वभूमी समजवाण्याचा प्रयत्न केला, तसेच वनमंत्री, वनकार्यालयातील सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्डचे प्रदेशिक अधिकारी, जिल्हा न्यायाधिश या अधिकाऱ्यांच्या बैठका आयोजीत केल्या



Asst. Prof.
M.E.S.Class
Govt.College of Art's
Science A'bad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Govt. College of Arts & Science
Scanned with OKEN Scanner

8) आंदोलनकर्त्यांनी खाण परिसरातील व ताडोबाच्या क्षेत्रामध्ये वास्तव्यास असलेल्या लोकांचे मत जाणून घेण्याकरीता विशेष पंचायत सभांचे आयोजन केले, यातील 4 क्षेत्रातील लोकांनी या खाणींना तिव्र विरोध केला, या सर्व सभांचे मिनीट व लोकांचे विचार, वने व पर्यावरण मंत्र्यांना कळविण्यात आले.

9) आंदोलन पुन्हा तिव्र व व्यापक व्हावा या करिता आंदोलन कर्त्यांनी विविध माध्यमांपैकी इलेक्ट्रानीक प्रसारमाध्यमांचा योग्य वापर केला, तसेच दुरदर्शन व सिटी केबल द्वारे राष्ट्रीय पातळीवर हे आंदोलनांचा प्रसार करण्यात आला, ही बाब शासनाला कळाल्याने केंद्रीय शासनावर सापडल्यामुळे दबाव वाढला.

10) दिनांक 28 जुलै 2000 रोजी शहरातील विविध संघटनांनी चंद्रपूर शहर बंदचे आव्हान केले. हा बंद अधिक तिव्रस्वरुपाचा होता यात वर उल्लेख केलेल्या सर्वच संघटनांनी भाग घेवून शहरातील शाळा, महाविद्यालये, दुकाने, मोठी व्यापारी दुकाने, सिटी बसेस, ऑटो व शहरातील सर्वच कार्यालये व बंद ठेवून आंदोलनाला सहकार्य केले. या बंदमुळे लक्षात आले की आंदोलन कार्य, प्रगतीपथावर आहे व यशस्वी सुध्दा.

11) दिनांक 1 ऑगस्ट 2000 रोजी डॉ. गुणपाचारे व अन्य आंदोलनकर्त्यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांना आंदोलना कडे तत्वतीक लक्ष घालण्याकरीता भाग पाडले. त्यांनी दुरध्वनी वरुन आंदोलनकर्त्यांशी संभाषन केले व सकारात्मक असल्याचे सुचवीले व ते स्वतः खाण परिसराला भेट दिली आणी आंदोलनकर्त्यांना आश्वस्त केले व खाणींना बंद करण्यास सुचना केली. अशा प्रकारे आंदोलनकर्त्यांचा विजय झाला, बंडू धोत्रे यांनी, सामाजिक कार्यकर्त्या परमिता गोस्वामी हीच्या हातून नारळ पाणी प्राशन करुन आपले उपोषन मागे घेतले.

## विविध मान्यवर व अधिकाऱ्यांच्या भेटी:

'अदानी पॉवर लिमीटेड' कंपनीला आवंटीत कोल ब्लॉक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील व्यास्तव्यास असलेल्या प्राण्यांना अत्यंत धोकादायक आहे. याकरीता शासकिय कर्मचारी ज्यांनी या क्षेत्राला भेटी दिल्या त्यांनी या खाणींची मान्यता रद्द करण्याकरीता पुढाकार घेण्यास आंदोलनकर्त्यांना आश्वासन दिले. आंदोलन काळात 'राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण', 'राज्य जैवविविधीता मंडळ' 'राज्य वन्यजीव संचालक' व महाराष्ट्र वन विभागातील अधिकाऱ्यांनी खाण प्रकल्पांना भेटी दिल्या तसेच देशांत विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या स्वंयसेवी संघटनांनी आंदोलन काळात चंद्रपूर शहराला भेटी दिल्या, 'बॉम्बेहिस्ट्री नेचर सोसायटी' ग्रीण प्लॅनेट इंडिया, माईन मिनरल एन्ड पिपल, वनराईचे सभासद व तरुनभारत सिंग, डावुन टू अर्थ इत्यादी संस्थांच्या सभासदांनी सभामंडपांना भेटी देवून सकारात्मक भुमिका मांडली.

## खाणींची मान्यता रद्द:

'वने व पर्यावरण मंत्रालया'कडून दिनांक 24 नोव्हेंबर 2000, मध्ये अदानी समुहाला दिलेला खाणींचा प्रस्ताव रद्द करण्यात आल्याचे पत्र अदानी समुहाला पाठविले. पत्रात स्पष्ट उल्लेख केला आहे की, आवंटीत करण्यात आलेल्या या दोन्ही खाणी महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात असलेल्या



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Asst. Prof.
M.E.S.Class-I
Art's

Scanned with OKEN Scanner

'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा'च्या अगदी शेजारी असून या प्रकल्पातील जगप्रसिध्द वाघ, अन्य प्राणी तसेच येथिल अन्य प्रजाती अत्यंत धोकादायक स्थितीमध्ये आहेत.ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पापासून अगदी 12 तर दुसरी खाण केवळ 10 कि.मीटरच्या अंतरावर आहे. याहीपुढे मुख्य वनसवरंक्षक वनविभाग चंद्रपूर, यांना सुचना केली की अदानी समुहाला आवंटीत आवंटीत करण्यात आलेली खाण ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोरझोन, बफरझोन व वाघांच्या भ्रमणक्षेत्रे आहेत, त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या उपक्रमांकरीता किंवा खाणी करीता कसल्याच प्रकारची मान्यता देवू नये, हे आरक्षीत जंगले आहे. या ठिकाणी वन्य प्राणी भ्रमण करतांना स्थानीकांनी बघीतले आहेत. त्यात उल्लेख केला आहे की, भारतात अगोदरच दिवसेंदिवस वाघांच्या संखेत घट होत आहे, (1411) किंबहुना राष्ट्रीय सरासरी पेक्षा महाराष्ट्रात अगदी कमी जंगले आहेत. त्यामुळे देशातील वाघांचे स्वरक्षण करणे फार आव्हानात्मक आहे. व्याघ्र प्रकल्पाशेजारी बफरझोन किंवा भ्रमणक्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारच्या भूमिगत किंवा खुल्याखाणींची मान्यता देवू नये. वनाधिकाऱ्यांनी शासनाला कळविल्याचा सुध्दा उल्लेख यात केला आहे. वनविभागाने कळविले होते की, या परिसरामध्ये वाघांनी जवळपास 30 लोकांवर हल्ला केला आहे, येथे मानव व प्राणी संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. या सर्व बाबींचा व घटनां विचारात घेता केंद्रीय पर्यावरण मंत्री जयराम रमेश व मंत्रालयाशी संबधीत **'नॅशनल टायगर कंझरवेशन'** आर्थोरिटी, सचिव **राजेश गोपाल** यांनी 26 जानेवारी 2010 ला प्रत्यक्ष भेट देवून या खाणींची मान्यता रद्द केली.

**परिणामांचे संक्षिप्त विवेचन:**

चंद्रपूर जिल्ह्यातील अदानी समुहाला आवंटीत करण्यातआलेल्या खाणींच्या विरोधात केलेल्या आंदोलनाला स्वंयसेवी संघटनां व सर्वसामान्य जनतेचा भक्कम पाठींबा मिळाला त्यामुळे केंद्रीय शासनालासुध्दा आपला निर्णय बदलवण्यास भाग पडले उत्तराखंडमधील चिपको आंदोलन, पश्चिम बंगाल मधील सिंगूर व महाराष्ट्रातील हेटवन या महत्वांच्या आंदोलना प्रमाणेच या आंदोलनालासुध्दा प्रसिध्दी मिळाली, त्यामुळे अन्य आंदोलना प्रमाणेच हे आंदोलनसुध्दा महत्वाचा आहे. या आंदोलनातून एक महत्वाची बाब समोर आली ती ही की, सामान्य जनतेनी वाघांच्या स्वरक्षणा करिता, त्यांच्या निवासक्षेत्रांच्या बचावा करिता, आदिवासींच्या निवासस्थानाच्या बचावा करीता व पर्यावरणाच्या स्वरक्षणा करीता हाक दिली, त्यानंतर काही महत्वपूर्ण स्वंयसेवी संस्थांनीसुध्दा सर्वोतोपरी मदत केली. भारतामध्ये अशाप्रकारची परिस्थिती दिवसेंदिवस वाढत आहे. येथिल 150 पेक्षा जास्त जिल्ह्यातील घनदाट जंगलांमध्ये भूगर्भाच्या आत खणिजांचे संचीत साठे आहेत. या सर्व जिल्ह्यामध्ये अत्यंत विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे कारण ही सर्व जंगले व यातील वन्यप्राणी निष्ट कोण्याचा मार्गावर आहेत. त्यामुळे प्र्यावरण रक्षणा सामान्य जनता स्वयंसेवी संघटनेचे योगदान अत्यंत महत्ववाची भूमिका बाजावू शकतात.

चंद्रपूर शहरामधील जनतेचा फार मोठा सहभाग आहे आवंटीत खाणींची मान्यता रद्द करण्यामागे त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आंदोलनकर्त्यांनी खाणीविरोधात जो घटला न्यायालयात दाखल केला याचा निकाल केंद्रीय व राज्य शासनाच्या विरोधात व आंदोलनकर्त्यांच्या बाजुने दिला, ही लढाई मुख्य होती. खाण परीसरातील खेड्यांनी ग्रामसभांद्वारे विरोध प्रदर्शित केला, या



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

आंदोलनाचे सार असे की, केवळ वन विभागाचे व पर्यावरणमंत्रालयाचे नियम सध्याघडीला पुरेशी नाहीत, कारण खाजगीकरणाच्या या युगात अश्या प्रकारचे कायदे पायमल्ली तुडवील्या जातात लाक जागृत असने व त्यांच्या अशा आंदोलनात सहभागी असने अत्यंत महत्वाचे आहे.

संदर्भः


- Environment impact assessment plan, M/s Adani power lilimited Gurgaon,-2008.
- EIA Report submitted to MPCB by Adani power limited, Chapter III, appendix III.
- Minutes of the deal location latter to the company, from MOIF, Date 24th November,-2009.
- वने व पर्यावरण मंत्रालय, पर्यावरण भवन, न्यू दिल्ली, संदर्भीय पत्रव्यवहार, 16 मे 2008, मेसर्स अदानी पॉवर लिमीटेड.
- मुंबई उच्चन्यायालय, खटला कमांक WPST/12585/2009.
- लोकसत्ता, लोकमत, मराठी वृत्तपत्रे.
- Times of India, Hitwad News Papers. व अन्य वर्तमानपत्रांतील लेखांचा अभ्यास.


Govt. College of Arts & Science Aurangabad

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad



Scanned with OKEN Scanner